# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:10.02.2026** **वार:मंगळवार**

**ठळक बातम्या**

- **राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर, सहा जिल्हा परिषदांवर भाजपाचं वर्चस्व, पुण्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसला मोठं यश**
- **पुणे महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपाच्या मंजुषा नागपुरे, तर उपमहापौरपदी आरपीआयचे परशुराम वाडेकर यांची बिनविरोध निवड**
- **राज्यात लवकरच ७० हजार पदांसाठी भरती प्रक्रीया सुरू करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सूचना**
- **परीक्षांना आत्मविश्वासानं सामोरं जाण्याचा पंतप्रधानांचा विद्यार्थ्यांना सल्ला**
- **आणि**
- **राज्य शिक्षण मंडळाची बारावीची परीक्षा आजपासून**

आता सविस्तर बातम्या

**जिल्हापरिषद निवडणूक**

राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे निकाल काल जाहीर करण्यात आले. या निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने बाजी मारली आहे. १२ पैकी ६ जिल्हा परिषदांमध्ये भाजपाला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत.

जिल्हा परिषदेच्या राज्यातल्या एकंदर ७३१ जागांपैकी २२५ जागांवर भाजपानं विजय मिळवला आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेसला १६५, तर शिवसेनेला १६२ जागांवर यश मिळालं. कॉंग्रेसला ५५, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला २६, तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ४३ जागा मिळाल्या.

१२५ पंचायत समित्यांमधील एकंदर १ हजार ४६२ जागांपैकी सर्वाधिक ४५९ जागा भाजपानं जिंकल्या आहेत. राष्ट्रवादी कॉंग्रेसला ३०६, शिवसेनेला ३०२, कॉंग्रेसला ९७, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला ८९, तर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला ४६ जागा मिळाल्या आहेत.

सातारा, सोलपूर, छत्रपती संभाजी नगर, परभणी, सिंधुदुर्ग आणि धारशिवमध्ये भाजपाने सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. पुणे आणि कोल्हापूरमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस, रत्नागिरी आणि रायगडमध्ये शिवसेना, सांगलीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष तर लातूरमध्ये कॉंग्रेसला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत.

पुणे जिल्हा परिषदेत ७३ पैकी ५१ जागा जिंकून राष्ट्रवादी कॉंग्रेसने वर्चस्व राखलं आहे.

**प्रतिक्रिया**

राज्यातल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुकीत महायुतीला मिळालेल्या यशाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जनतेचे आभार मानले आहेत. या यशातून सरकारनं केलेल्या कामावर जनतेनं शिक्कामोर्तब केल्याचं स्पष्ट होत असल्याची प्रतिक्रिया मुख्यमंत्र्यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली.

**महापौर कार्यभार**

पुणे महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपाच्या मंजुषा नागपुरे, तर उपमहापौरपदी आरपीआयचे परशुराम वाडेकर यांची काल बिनविरोध निवड करण्यात आली. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार, माजी खासदार सुरेश कलमाडी, माजी महापौर शांतीलाल सुरतवाला यांचं निधन झाल्यानं ही निवडणूक बिनविरोध करून श्रद्धांजली सभेसाठी सर्वांनी वेळ द्यावा असं आवाहन

महापालिकेचे गटनेते गणेश बिडकर यांनी विरोधी पक्षांना केलं. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या शीतल सावंत आणि काँग्रेसच्या अश्विनी लांडगे यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतले.
महापौर आणि उपमहापौर निवडीनंतर महापालिकेच्या सभागृहात दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी त्यांच्या कार्याचं, राजकीय आणि सामाजिक योगदानाचं स्मरण करण्यात आलं.

लातूर महानगरपालिकेच्या महापौरपदी जयश्री सोनकांबळे आणि उपमहापौरपदी स्नेहल उटगे यांची बिनविरोध निवड झाली. तर जालना शहराच्या महापौरपदी वंदना मगरे, तर उपमहापौरपदी राजेश राऊत यांची बिनविरोध निवड झाली.
नागपूर महापालिकेत नवनिर्वाचित महापौर नीता ठाकरे आणि उपमहापौर लाला हाथीबेड यांनी काल पदभार स्वीकारला.
अमरावती महापालिकेतही श्रीचंद तेजवाणी यांनी महापौर आणि सचिन भेंडे यांनी उपमहापौर पदाचा कार्यभार स्वीकारला.

**मुख्यमंत्री**

राज्यात लवकरच नोकर भरती प्रक्रिया नव्या पद्धतीने राबवली जाणार आहे. जवळपास ७० हजारांहून अधिक पदांची भरती टप्प्याटप्प्याने केली जाईल. यामध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सुमारे ५० हजार पदं  आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाबाहेरील २० हजार पदांचा समावेश असेल. भरती प्रक्रिया राबवताना आवश्यक कौशल्य, सेवा प्रवेश, पात्रता आणि कामाच्या स्वरूपानुसार निर्णय घेण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.
मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत या संदर्भात बैठक झाली; यावेळी ते बोलत होते. भरती प्रक्रियेत कोणताही पक्षपात किंवा अन्याय होऊ नये, यासाठी संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि विश्वासार्ह असावी, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिले. भरती प्रक्रियेत अनावश्यक कागदपत्रे, लांब रांगा आणि विलंब टाळण्यासाठी ऑनलाईन तसेच डिजिटल व्हेरिफिकेशन मॉडेल विकसित करण्यावर भर देण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला केल्या.

या प्रादेशिक बातम्या आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून ऐकत आहात

**पंतप्रधान परीक्षा पे चर्चा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाच्या नवव्या आवृत्तीच्या दुसऱ्या भागात देशभरातल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. दहावी, बारावीच्या परीक्षा जवळ येत असल्यानं, परीक्षेचा ताण, परीक्षेची तयारी, वेळ व्यवस्थापन अशा विविध विषयांवर पंतप्रधानांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केलं. परीक्षांना आत्मविश्वासानं सामोरं जावं असा सल्ला देताना ते म्हणाले –

**S/Bपंतप्रधान ---**

लहान स्टार्टअपच्या माध्यमातून उद्योगाची सुरुवात, विविध छंद जोपासणे अशा अनेक बाबींवर बोलतानाच तंत्रज्ञानाची भीती बाळगू नका तसंच त्याच्या आहारीही जाऊ नका, असं त्यांनी कृत्रिम बुद्धीमत्तेसंदर्भातल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. साडे चार कोटी विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी मायगव्हच्या माध्यमातून नोंदणी केली होती अशी माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दिली.

**बारावीपरीक्षा**

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षा आज पासून सुरू होत आहेत. येत्या १८ मार्च पर्यंत पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमध्ये परीक्षा होणार आहेत. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधिकडून

**स्क्रिप्ट**

राज्य शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेसाठी यंदा १५,३२,४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. संपूर्ण राज्यात ३ हजार ३८७ मुख्य केंद्रावर ही परीक्षा होणार आहे. विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याच्या दृष्टीने महत्वाच्या बहुतांश विषयांच्या पेपरमध्ये खंड ठेवण्यात आला आहे. मंडळामार्फत अधिकृतरित्या प्रसिध्द आणि छपाई केलेले वेळापत्रकच ग्राहय धरावं, अन्य

संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले वेळापत्रक ग्राहय धरु नये, असं आवाहन मंडळानं केलं आहे. परीक्षांच्या कालावधीत अनेकदा विद्यार्थी मानसिक दडपणाखाली असतात, अशा विद्यार्थ्यांना नैराश्येतून बाहेर काढण्यास मदत करण्यासाठी राज्य मंडळ स्तरावरुन समुपदेशन करण्यासाठी १० समुपदेशकांची नियुक्तीही करण्यात आली आहे. तसंच राज्य मंडळ आणि ९ विभागीय मंडळात नियंत्रण कक्ष कार्यरत करुन हेल्पलाईन सुविधाही उपलब्ध करुन दिली आहे. विद्यार्थ्यांनी कोणतंही दडपण न घेता उत्सवाच्या भावनेने परीक्षेला सामोरे जावे, अशा शब्दात राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

**नरेंद्र जाधव समिती अहवाल सादर**

राज्यातल्या शाळांमध्ये त्रिभाषा धोरण राबवण्यासंदर्भात शिक्षणतज्ञ डॉक्टर नरेंद्र जाधव यांच्या समितीने काल आपला अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सादर केला. या समितीनं राज्यभरात दौरे करत राजकीय नेत्यांसह संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींसोबत संवाद कार्यक्रम आणि जनसुनावणी घेतली. लवकरच हा अहवाल मंत्रिमंडळासमोर ठेवण्यात येईल.

**संसद गदारोळ**

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात काल नवव्या दिवशीही सदस्यांच्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज आधी दुपारी २ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं. लोकसभेत बेशिस्त वर्तन केल्याबद्दल निलंबित झालेल्या ८ सदस्यांनी काल संसदभवन परिसरात निदर्शनं केली. लोकसभेत सभापती ओम बिर्ला यांच्याविरोधात अविश्वासाचा ठराव आणण्याचा निर्णय विरोधी पक्षांनी घेतला आहे. तर लोकसभेतल्या गदारोळाला काँग्रेस जबाबदार असल्याचा आरोप केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केला आहे.
राज्यसभेत काल केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चेला सुरुवात झाली. काँग्रेसचे पी. चिदंबरम यांनी चर्चेचा प्रारंभ केला. या अर्थसंकल्पात अनेक योजना जाहीर झाल्या पण त्यांच्यासाठी पुरेसा निधी मिळाला नाही किंवा जाहीर झाला नाही, असं चिदंबरम म्हणाले.

**हवामान**

राज्याच्या काही भागात सध्या तापमानात काहीशी वाढ झाल्याचं दिसून येत आहे. तर मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात किंचित घट झाली आहे. येत्या दोन दिवसात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या**

- **राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर, सहा जिल्हा परिषदांवर भाजपाचं वर्चस्व, पुण्यात राष्ट्रवादी कॉँग्रेसला मोठं यश**
- **पुणे महानगरपालिकेच्या महापौरपदी भाजपाच्या मंजुषा नागपुरे, तर उपमहापौरपदी आरपीआयचे परशुराम वाडेकर यांची बिनविरोध निवड**
- **राज्यात लवकरच ७० हजार पदांसाठी भरती प्रक्रीया सुरू करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सूचना**
- **परीक्षांना आत्मविश्वासानं सामोरे जाण्याचा पंतप्रधानांचा विद्यार्थ्यांना सल्ला**
- **आणि**
- **राज्य शिक्षण मंडळाची बारावीची परीक्षा आजपासून**

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशीक बातमीपत्र संपलं .नमस्कार .